# <u>पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई</u>

## <u>प्रेसनोट</u>

## <u>दोन वर्षाच्या अल्पवयीन अपहृत बालकाची १२ तासाच्या आत सुटका</u>

---

दि. १६/०६/२०२२ रोजी वपोनि तळोजा पोलीस ठाणे श्री. जितेंद्र सोनावणे यांनी वपोनि पनवेल तालुका श्री. रविंद्र दौडकर यांना कळविले की, त्यांचे पोलीस ठाणे नेमणुकीतील पो.शि. /१२०७० संदेश उत्तेकर यांना खबर मिळाली आहे की, एका महिलेने अल्पवयीन बालकास अपहरण करुन त्यास भिंगारवाडी, ता. पनवेल येथे लपवुन ठेवले आहे व तिच्या सोबतच्या इसमाचा मोबाईल नंबर xxxxxxxxxx असा आहे.

सदरची माहीती मिळताच तात्काळ वपोनि रविंद्र दौंडकर यांनी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १, वाशी नवी मुंबई व सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग यांना माहिती देवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेप्रकटीकरण पथकाचे सपोनि संजय गळवे व पथकास प्राप्त बातमीची शहानिशा करणेकामी रवाना केले. सदर माहीतीवरुन सदर पथकाने तांत्रिक तपास करुन प्राप्त माहीतीच्या आधारे खानावळे वाडी, बोधलेवाडी आदिवासी पाडा, खानावळे येथुन महिला नामे xxxxxxxxxxx हिस ताब्यात घेतले व तिच्याकडे **अपहृत** बालकाबाबत चौकशी केली असता तिने **अपहृत** मुल स्वत:च्या घरात लपवुन ठेवल्याचे सांगीतले. तात्काळ मपोशि ३७१५/घरत हिचे मदतीने अल्पवयीन मुलगा वय अंदाजे २ वर्षे यास ताब्यात घेवुन त्याची यशस्वीरित्या सुखरूप सुटका केली. तसेच महिला आरोपी नामे xxxxxxxxxxx हिस मपोशि ३७१५/घरत यांचे मदतीने ताब्यात घेवून तिची चौकशी करता तिने सदरचे बालक हे रेल्वे बुकिंग ऑफीसजवळ, पनवेल रेल्वे स्टेशन, पनवेल येथुन पळवुन आणल्याचे सांगितले त्यामुळे सदर घटनास्थळी जावुन माहीती घेतली असता **पनवेल रेल्वे पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २०७/२०२२ कलम ३६३ भादवी अन्वये दिनांक १६/०६/२०२२ रोजी १५.५५ वा.** गुन्हा दाखल असल्याचे समजले. तात्काळ सदरची माहीती पनवेल रेल्वे पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक पाडवी यांना देण्यात आली. त्यांनी सदर अल्पवयीन मुलाचे आई–वडीलांना समक्ष पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे आणले व त्याचेकरवी खात्री करून सदर बालक नामे xxx हा त्यांचाच मुलगा असल्याचे सांगितले व त्यांनी नवी मुंबई पोलीस व रेल्वे पोलीसांचे मनापासुन आभार मानले.

सदरची यशस्वी कामगीरी ही पोलीस आयुक्त श्री. बिपीन कुमार सिंह, पोलीस सह आयुक्त डॉ. जय जाधव, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १ श्री. विवेक पानसरे, सहाय्यक पोलीस आयुक्त पनवेल विभाग श्री. भागवत सोनवणे, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. रविंद्र दौडकर वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल तालुका पो. ठाणे, श्री. जितेंद्र सोनावणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तळोजा पो. ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा.पोलीस निरिक्षक संजय गळवे, पो.हवा. ५६९/महेश धुमाळ, पो.ना. २१०५/पंकज चंदिले, पो.ना.२३२५/प्रकाश मेहेर, पोहवा/६३४ विकास साळवी पो.ना./२४८४ जयदिप पवार, पो.ना./२३ वैभव शिंदे, पो. शि./१२०७० संदेश उत्तेकर व भिंगारवाडीचे पोलीस पाटील श्री. संतोष गायकर पथकाने केलेली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पनवेल रेल्वे पोलीस स्टेशनचे पो.नि. श्री. प्रविण पाडवी करीत आहेत.


विशेष पथक,
परिमंडळ-1, वाशी,
नवी मुंबई